पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.
मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ०३

**सभावृत्तांत**

**दिनांक - १०/१२/२०२१** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती पाक्षिक सभा गुरूवार दिनांक **१०/१२/२०२१** रोजी दुपारी ३**.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा. उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
२. मा. सोनवणे शारदा हिरेन
३. मा. अश्विनी संतोष जाधव
४. मा. बाबर शर्मिला राजू

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा. सुषमा शिंदे - सहा, आयुक्त, मा.अनिता केदारी - प्र. क्रीडा अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र.१) भैरवनाथ प्रतिष्ठाण रामनगर रहाटणी या संस्थेस म.न.पा.चे व्यायाम शाळा व तालीम सेवाशुल्क तत्वावर चालविणेस मान्यता देणे बाबत...**

**विषय क्र.२) भाडे कराराने तसेच सेवाशुल्क तत्वावर कराराने चालविण्यास देण्यात आलेल्या क्रीडा सुविधांचा मिळकत कर रद्द करणेस मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभेमार्फत, मा.महापालिका सभेची मान्यता घेणे बाबत...**

**विषय क्र.३) मे.सुमित स्पोर्ट्स अँड फिटनेस इक्विपमेंट्स चिंचवड यांना नेहरूनगर व संभाजीनगर जलतरण जलतरण तलाव पाणी शुद्धीकरण,परिसर स्वच्छता साफ सफाई व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज मंजूर दरानुसार देणे बाबत..**

----------

खालील प्रमाणे सुचना मांडण्यात आली

सुचक - मा.अश्विनी जाधव अनुमोदक - मा.शर्मिला बाबर

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती (कार्यपत्रिका क्र.०३ ) शुक्रवार दिनांक १०/१२/२०२१ रोजीची पाक्षिक सभा दि.२३/१२/२०२१ रोजी दु.३.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

----------

सभापती - दि.२३/१२/२०२१ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( उत्तम प्रकाश केंदळे )**
**सभापती**
**मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.
कार्यपत्रिका क्रमांक - ०३
मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती
**सभावृत्तांत**

**दिनांक - २३/१२/२०२१** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **२३/१२/२०२१** रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा. उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
२. मा. सोनवणे शारदा हिरेन
३. मा. अश्विनी संतोष जाधव
४. मा. बाबर शर्मिला राजू

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा. सुषमा शिंदे - सहा.आयुक्त, मा.अनिता केदारी - प्र. क्रीडा अधिकारी, मा.देवेंद्र बोरावके - उप अभियंता, मा.राजेंद्र नगापुरे - पर्यवेक्षक सभेस उपस्थित होते.

----------

१) दिनांक २६/११/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०२) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २३/१२/२०२१ विभाग - क्रीडा
सुचक - मा.शर्मिला बाबर अनुमोदक - मा.अश्विनी जाधव

संदर्भ - मा. शर्मिला बाबर व मा. अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.२७ रहाटणी गावठाण व्यायाम शाळा व तालीम तलाठी कार्यलया मागील भैरवनाथ प्रतिष्ठाण रामनगर रहाटणी या संस्थेस म.न.पा.चे क्रीडा धोरण भाग-२ विविध क्रीडा सुविधा मधील अटी व शर्तीनुसार दरमहा र.रु.२०००/-म.न.पा.कडून सेवाशुल्क देऊन ११ महिने कराराने व्यायाम शाळा व

तालीम आदेशाचे तारखेपासून सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देण्याच्या मान्यतेकामी मा.स्थायी समिति सभेकडे शिफारस करणेत येत आहे,

सदर ठराव सर्वानुमते मान्या झाला

---------

ठराव क्रमांक - ०४
दिनांक - २३/१२/२०२१
सुचक - मा.शर्मिला बाबर

विषय क्रमांक - ०२
विभाग - क्रीडा
अनुमोदक - मा.शारदा सोनवणे

संदर्भ - मा. शर्मिला बाबर व मा. शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून बॅडमिंटन हॉल, लॉन टेनिस कोर्ट, क्रीडा मैदाने भाडे कराराने चालविण्यास दिली जातात. तसेच म.न.पा. व्यायामशाळा ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिली जातात. या भाडे कराराने तसेच सेवाशुल्क तत्वावर कराराने चालविण्यास देण्यात आलेल्या क्रीडा सुविधांना करसंकलन विभागाकडून मिळकत कर आकारला जातो. सदरच्या मिळकती म.न.पा. मालकीच्या असल्याने त्यांचा मिळकतकर म.न.पा. कडून भरणे आवश्यक आहे. तरी भाडे कराराने तसेच सेवाशुल्क तत्वावर कराराने चालविण्यास देण्यात आलेल्या क्रीडा सुविधांचा मिळकत कर रद्द करणेकरिता मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्या झाला

----------

ठराव क्रमांक - ०५
दिनांक - २३/१२/२०२१
सुचक - मा. शर्मिला बाबर

विषय क्रमांक - ०३
विभाग - क्रीडा
अनुमोदक - मा.अश्विनी जाधव

संदर्भ - मा. शर्मिला बाबर व मा. अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

मे.वरदायिनी एन्टरप्रायजेस चिंचवड यांना नेहरूनगर व संभाजीनगर जलतरण तलाव पाणी शुद्धीकरण, परिसरस्वच्छता साफसफाई व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज सुरु करणे कामी, करारनामा करणेकामी कळविले असता, त्यांनी तोंडी या २ जलतरण तलावाची, स्थापत्य विषयक कामे झाल्यानंतर करारनामा करण्यात येईल असे सांगितले. स्थापत्य विषयक कामे किरकोळ आहेत.तरी मे.सुमित स्पोर्ट्स अँड फिटनेस इक्विपमेंट्स चिंचवड यांना, मे.वरदायिनी एन्टरप्रायजेस चिंचवड यांचे निविदा मंजूर दरानुसार जानेवारी २०२२ ते एप्रिल २०२२ करिता नेहरूनगर व संभाजीनगर जलतरण

तलाव पाणी शुद्धीकरण, परिसर स्वच्छता साफसफाई व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज देणेस, मान्यताकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( उत्तम प्रकाश केंदळे )**
**सभापती**
**मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५६६/२०२१
दिनांक - २४/१२/२०२१



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.